आधुनिक शहरातील घडामोडी
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
e Paper
वर्ष 4 थे
www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 15/09/2026 METRO CITY VRUTANT
संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 195 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा -मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : परंपरेचे जतन आणि पर्यावरणाचे संरक्षण यांचा समतोल साधणे ही सामूहिक जबाबदारी आहे. गणेशोत्सवाचा आनंद घेताना पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. पारंपरिक पद्धतींचा आदर राखत पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**




गणेश चतुर्थीच्या मंगलमय मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांचे मुंबईतील निवासस्थान 'वर्षा' येथे श्रीगणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने बाप्पाची पूजा-अर्चा करून आरती केली.

श्रीगणेशाच्या चरणी प्रार्थना केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील तसेच देशभरातील गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विघ्नहर्त्याने सर्वांच्या जीवनात आनंद आणून सर्व विघ्ने दूर करावीत. देश, राज्य, नागरिक आणि बळीराजासमोरील अडचणी दूर होऊन सर्वांना नवचैतन्य, सामर्थ्य आणि समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली. मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, आनंद आणि परंपरेचा उत्सव आहे. सर्व गणेशभक्तांनी हा उत्सव आनंदाने आणि भक्तिभावाने साजरा करावा. मात्र, गणेशोत्सवाच्या उत्साहाबरोबरच पर्यावरणाचे भान राखण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून तो समाजाला एकत्र आणणारा, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीची भावना दृढ करणारा उत्सव असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केले. परंपरेचे जतन, पर्यावरणाचे संरक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय साधत सर्वांनी पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

# 'सीटीईटी' परीक्षेचे नवे वेळापत्रक जाहीर!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (सीबीएसई) घेण्यात येणारी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) आता 12 आणि 13 डिसेंबर रोजी घेतली जाणार आहे. उमेदवारांना देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांबाबतची माहिती परीक्षेपूर्वी 15 दिवस प्रसिद्ध करण्यात येणार आहे.**



सीबीएसईने या बाबत परिपत्रकाद्वारे माहिती दिली. सीबीएसईतर्फे 22व्या सीटीईटीसाठी 11 मे ते 10 जून या कालावधीत अर्ज प्रक्रिया राबवण्यात आली होती. तर परीक्षा 6 सप्टेंबर रोजी घेतली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र, शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होण्यासाठी शिक्षकांना पुरेशी संधी देण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.अनुषंगाने उमेदवारांच्या व्यापक हिताचा विचार करून प्रस्तावित सीटीईटीसाठी नोंदणी करु न शकलेल्या उमेदवारांना नोंदणी करण्यासाठी 25 ऑगस्ट ते 1 सप्टेंबर या कालावधीत संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच परीक्षेची नवी तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर देशभरातील परीक्षा केंद्रांवर 12 आणि 13 डिसेंबर रोजी सीटीईटी आयोजित करण्यात येणार आहे. उमेदवारांचे परीक्षा केंद्र आणि परीक्षेची तारीख परीक्षेपूर्वी 15 दिवस, तर प्रवेशपत्र परीक्षेपूर्वी दोन दिवस आधी उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना टीईटी किंवा सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक असल्याचा निकाल दिला आहे. तसेच शिक्षकांना उत्तीर्ण होण्यासाठी 2028पर्यंतची मुदत दिली आहे. त्यामुळे सीटीईटी किंवा टीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊन आवश्यक पात्रता मिळवण्यासाठी शिक्षक प्रयत्नशील आहेत. देशपातळीवर घेतल्या जाणाऱ्या सीटीईटीशिवाय राज्यांमध्ये स्वतंत्रपणे टीईटी परीक्षाही घेतली जाते.

# पुणे फेस्टिव्हलच्या 'श्री'ची प्रतिष्ठापना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : 38 व्या पुणे फेस्टिव्हलच्या 'श्रींची' प्रतिष्ठापना सोमवार, दि. 14 सप्टेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता हॉटेल सारस, नेहरू स्टेडियम, पुणे येथे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) चे आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अभिजित चौधरी आणि त्यांच्या पत्नी डॉ.अनुश्री चौधरी यांच्या हस्ते संपन्न झाली.**

वेदमूर्ती पं. धनंजय घाटे गुरुजी यांनी याचे पौराहित्य केले. यानिमित्त हॉटेल सारस येथील हॉल सुशोभित करण्यात आला होता. येरवडा कारागृहातील कैद्यांनी तयार केलेली गणेश मूर्ती यावेळी आवर्जून प्रतिष्ठापने साठी आणण्यात आली होती.

याप्रसंगी पुणे फेस्टिवलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, ॲड. अभय छाजेड, डॉ. सतीश देसाई, रमेश बागवे, सुनील शिंदे, अबेदा इनामदार, आय. पी. इनामदार, काका धर्मावत, राजू साठे, अतुल गोंजारी, द.स.पोळेकर, बाळासाहेब अमराळे, सुप्रिया ताम्हाणे, ॲड. अनुराधा भारती, अशोक मेमजादे, डॉ. रवी चौधरी, कर्ना उपाध्याय, आबा जगताप, संयोगिता कुदळे, तेजश्री अडिगे, नावेद अत्तार तसेच विनोद सुर्वे, नामदेव चाळके, सचिन खवले, विजय शेटे आणि एन. आय. ई. एम. चे विद्यार्थी



# चिंचवड गणपती विसर्जन घाटाची पाहणी; स्वच्छता, प्रकाशव्यवस्था आणि सुरक्षेला प्राधान्य

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चिंचवड येथील गणपती विसर्जन घाटाची महापौर रवी लांडगे, आमदार उमाताई खापरे, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, 'ब' प्रभाग अध्यक्ष मंदार देशपांडे, नगरसेवक सुरेश शिवाजी भोईर तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.**

गणेश विसर्जनासाठी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन घाट परिसरातील स्वच्छता, प्रकाशव्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी, वाहतूक नियोजन आणि इतर आवश्यक सुविधांचा आढावा यावेळी घेण्यात आला. भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, तसेच विसर्जन प्रक्रिया सुरक्षित आणि सुरळीत पार पडावी, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. घाट परिसरात स्वच्छता नियमित ठेवण्याबरोबरच रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देणे, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे आणि गर्दीच्या वेळी प्रशासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय ठेवणे यावरही यावेळी भर देण्यात आला.

गणेशभक्तांना विसर्जनाच्या वेळी सुरक्षित आणि सुविधायुक्त वातावरण मिळावे, यासाठी महापालिका प्रशासनाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात, अशा सूचना नगरसेवक सुरेश शिवाजी भोईर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 15/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महापालिकेत नोकरीचे आमिष 1 लाख 14 हजारांची फसवणूक!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भोसरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत महिला व इतर व्यक्तींकडून पैसे घेत 1 लाख 14 हजार 112 रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे.

तारामती सोनबा मामणगर यांनी भोसरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार प्रतिक राजेश धाईजे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून ऑनलाइन तसेच रोख स्वरुपात पैसे घेतले. 3 ऑगस्ट ते 11 सप्टेंबरदरम्यान हा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी भोसरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.




# पोलिसांनी पकडलेल्या वाहनावर आमदाराचा लोगो; चालकाकडे परवानगी नाही

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भोसरी : कोणतीही परवानगी नसताना वाहनाच्या पुढील काचेवर आर्थिक फायद्यासाठी आमदाराचे नाव व लोगो लावल्याचा प्रकार भोसरी हद्दीत समोर आला आहे. वाहतूक विभागातील पोलिस शिपाई संतोष राजाराम निंचित यांनी तक्रार दिली आहे. 13 सप्टेंबर रोजी दुपारी हॉटेल शौर्यवाडा परिसरात ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी वसीम अहमद अब्दुल जतील (वय 42, रा. हडपसर), हितेंद्र अशोक कवडे (रा.घोरपडी) या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार वाहनाच्या पुढील काचेवर महाराष्ट्र विधानसभा सदस्य, आमदार असा मजकूर असलेला छापील लोगो लावण्यात आला होता. वाहनचालकाकडे तो लोगो लावण्यासाठी कोणतेही अधिकृत कागदपत्र नसल्याचे पोलिसांना आढळले. याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 15/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भोसरी पट्ट्यातील स्मशानभूमींमध्येही 'मरणयातना', शैलजा मोरेंची खंत

## चौथ्या दिवशीही दुरवस्थेचा आढावा; डुडुळगाव, दिघी, भोसरी आणि पिंपळे गुरव स्मशानभूमींची पाहणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहरातील स्मशानभूमींमधील समस्या जाणून घेण्यासाठी सुरु असलेल्या पाहणी मोहिमेच्या चौथ्या दिवशी माजी उपमहापौर शैलजा मोरे यांनी डुडुळगाव, दिघी गावठाण, भोसरी गावठाण आणि पिंपळे गुरव येथील स्मशानभूमींना भेट दिली. यावेळी विविध ठिकाणी पाणी, स्वच्छता, सुरक्षा, कर्मचाऱ्यांच्या सुविधा आणि मूलभूत सोयींचा अभाव असल्याचे निदर्शनास आले.**



डुडुळगाव स्मशानभूमीत कर्मचाऱ्यांना मेडिकिट व पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्याचे आढळले. जाळ्या तुटलेल्या असून पाण्याचे नळही खराब आहेत. स्वच्छतागृह पुराच्या पाण्यात वाहून गेल्यानंतर त्याची दुरुस्ती झालेली नाही. कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र केबिन, संरक्षण भिंत आणि चिमणीचीही सुविधा नसल्याचे पाहणीत समोर आले. तसेच, वापरलेले पाणी नदीपात्रात सोडले जात असल्याचे निदर्शनास आले.

दिघी गावठाणातील स्मशानभूमीत कर्मचाऱ्यांना मेडिकिट व विमा संरक्षण नसल्याचे, परिसरात राडारोडा व गवत वाढल्याचे आढळले. जळण विधीच्या ठिकाणी कोबा खराब असून विटांचीही दुरवस्था झाली आहे. शौचालयांमध्ये नळ व पाण्याच्या टाक्या नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. भोसरी गावठाण स्मशानभूमीत कचरा नियमित उचलला जात नसल्याने अस्वच्छता दिसून आली. प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नसून कर्मचाऱ्यांना मेडिकिट व पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्याचे आढळले. स्वच्छतागृहांचीही दुरवस्था झाली आहे.

यावेळी नगरसेविका राणी पठारे उपस्थित होत्या.

पिंपळे गुरव स्मशानभूमीत कर्मचाऱ्यांना मेडिकिट व विमा संरक्षण नसल्याचे, सफाई कामगार वेळेत काम करत नसल्याचे निदर्शनास आले. चिमण्या नसून जाळ्यांमध्ये कचरा साचला आहे. नदीपात्रात पाणी सोडले जात असून कर्मचारी व नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. पुराच्या पाण्यामुळे संरक्षण भिंतीचे नुकसान झाले आहे. या पाहणीवेळी माजी महापौर शकुंतला धराडे, नगरसेवक शाम जगताप आणि नगरसेविका रविना आंघोळकर उपस्थित होते.

# विशाल वाकडकर सोशल फाउंडेशनतर्फे पर्यावरणपूरक गणेश विसर्जन घाट सज्ज"

## "पर्यावरणपूरक विसर्जनासोबत मूर्तीदानातून अनाथ मुलांच्या शिक्षणाला मदत"

**गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा सण आहे. मात्र, या भक्तीसोबत पर्यावरणाचे रक्षण आणि सामाजिक बांधिलकी जपणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे. याच सामाजिक आणि पर्यावरणपूरक विचारातून विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशन यांच्या वतीने वाकड येथे पर्यावरणपूरक श्री गणेश विसर्जन घाट 2026 उभारण्यात आला आहे.**



द्रौपदा मंगल कार्यालयाजवळ, कस्तुरी चौक, हिंजवडी रोड, वाकड येथे उभारण्यात आलेला हा घाट 14 ते 25 सप्टेंबर 2026 या कालावधीत सकाळी 10 ते रात्री 10 या वेळेत गणेशभक्तांसाठी उपलब्ध राहणार आहे.

या घाटावर 5 फूट उंचीपर्यंतच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनाची तसेच मूर्तीदानाची सुसज्ज सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

नदी, नाले, ओढे व विहिरी यामध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन होऊन जलस्रोतांचे प्रदूषण होऊ नये, तसेच पर्यावरणाची हानी टाळता यावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. मूर्तीदानातून पर्यावरणासोबत समाजसेवेचा हातभार या उपक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे घाटावर विसर्जित अथवा दान केलेल्या गणेशमूर्तींचे श्री फाऊंडेशन पुणे या संस्थेमार्फत संकलन करण्यात येणार आहे. या मूर्तींचे पुनःशृंगार करून त्यांचा योग्य पद्धतीने उपयोग केला जाणार आहे. तसेच मूर्तीदान योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीद्वारे अनाथ मुलांच्या शिक्षणासह त्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी मदत केली जाणार आहे. त्यामुळे एका गणेशमूर्तीच्या विसर्जनातून पर्यावरणाचे संवर्धन आणि समाजातील गरजू मुलांच्या भविष्यासाठी मदत, असा दुहेरी सामाजिक संदेश या उपक्रमातून दिला जात आहे.

घाटावर भाविकांसाठी आरती व्यवस्था, निर्माल्य कुंड, प्रकाश व्यवस्था यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

वाकड, पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील नागरिकांनी आपल्या घरगुती, सोसायटीतील तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या शाडू मातीच्या आणि POP च्या गणेशमूर्तींचे विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने याच घाटावर करावे, असे आवाहन विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

नागरिकांनी गुलाल व रंगांचा वापर टाळावा, निर्माल्य केवळ निर्माल्य कुंडात जमा करावे आणि प्लास्टिकचा वापर टाळून स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968